गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# वाघा बार्डर बंद, सिंधू जल करार स्थगित

## पाकिस्तानची पूर्णतः कोंडी; सीसीएसच्या बैठकीत पाच महत्त्वाचे निर्णय

**नवी दिल्ली -** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी सीसीएस म्हणजे कॅबिनेट सुरक्षा सेक्युरिटीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत काश्मीरमधील दहशवाद आणि पाकिस्तान या विषयावर प्रामुख्याने चर्चा झाली असून ५ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर देखील या बैठकीला हजर होते. या बैठकीत वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीनंतर परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेऊन घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्तानची पूर्णतः कोंडी करण्यात आली आहे.

लष्कर आणि संबंधित विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून पंतप्रधानांना पूर्ण ब्रिफिंग करण्यात आले. त्यानंतर, अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्ताविरोधात ५ मोठे निर्णय घेत ५ तगडे धक्के पाकिस्तानला देण्यात आले आहेत. पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द करण्यात येत आहे. तसेच, भारतातील पाकिस्तान दुतावासाच्या अनुषंगाने देखील महत्त्वाचा निर्णय या बैठकीत झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानची व्यापाराच्या दृष्टीने कोंडी करण्याची रणनीती भारताने आखली असून आजच्या बैठकीतील निर्णयाचा दूरगामी परिणाम भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांवर होणार आहे.

भारताने आता पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलली आहेत. भारताकडून सिंधू जल कराराला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या ८० टक्के पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये सिंधू नदी पाण्याच्या वाटपासंदर्भात १९६० साली एक करार झाला होता. भारत आणि पाकिस्थानमध्ये तीन मोठी युद्धे झाली. त्यावेळीदेखील हा करार पाळण्यात आला होता. त्या कराराला आता स्थगिती देण्याचा निर्णय भारताने घेतला आहे.

बैठकीतील ५ मोठे निर्णय - १- पाक दिल्ली दूतावास कर्मचारी कपात, २- ४८ तासात पाकिस्तानी नागरिकांनी पान २ वर

### दशहतवाद्यांना जशास तसे उत्तर देणार - राजनाथ सिंह

जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात एकच खळबळ उडाली असून दहशतवाद्यांना संपवा अशी मागणी केली जात आहे. देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या दहशतवादी हल्ल्यावर प्रतिक्रिया दिली आहे. धर्माच्या आधारे पर्यटकांची हत्या करणे, निर्दोषांना ठार करणे हे कृत्य निंदनीय आहे. या हल्ल्यातील दहशतवाद्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही, त्यांना जशास तसं उत्तर दिलं जाणार अशा इशारा राजनाथ सिंह यांनी दिला. या हल्ल्यामध्ये सहभागी असलेल्या दहशतवाद्यांसोबतच पडद्यामागे जे कोणी यामध्ये सहभागी असतील त्यांना संपवलं जाईल असंही राजनाथ सिंह म्हणाले.

राजनाथ सिंह म्हणाले की, दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये केलेल्या भ्याड हल्ल्यात आपल्या देशाने अनेक निष्पाप नागरिकांना गमावले. या अत्यंत अमानुष कृत्याने आम्हा सर्वांना दुःख आणि वेदना झाल्या आहेत. सर्वप्रथम ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्या सर्व कुटुंबांप्रती मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. या दुःखाच्या प्रसंगी, दिवंगत आत्म्याच्या शांतीसाठी, मी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

राजनाथ सिंग पुढे म्हणाले की, आम्ही दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णुता धोरण बाळगतो. या भ्याड कृत्याविरुद्ध भारतातील प्रत्येक नागरिक एकवटला आहे. मी देशवासियांना आश्वासन देतो की, ही घटना लक्षात घेता भारत सरकार आवश्यक आणि योग्य ते सर्व पाऊल उचलेल. ज्यांनी पडद्याआड बसून भारताच्या भूमीवर अशी घृणास्पद कृत्ये करण्याचा कट रचला आहे त्यांच्यापर्यंत आम्ही पोहोचू. पहलगाममध्ये मृत्यूचं तांडव घडवून आणणाऱ्या त्या चार मानवरुपी दानवांचे फोटो समोर आले आहेत. आदिल गुरू, आसिफ शेख, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी त्यांची नावं आहेत. यातील दोन जण स्थानिक आहेत, तर दोन जण पाकिस्तानी आहेत. आदिल गुरी हा अनंतनाग जिल्ह्यातला आहे, तर आसिफ शेख हा सोपोरचा आहे. या हल्ल्यामागचा मास्टरमाईंड हा सैफुल्लाह खालिद उर्फ सैफुल्लाह कसुरी हा असल्याचं समोर आलं आहे. तो टीआरएफ या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असून हाफिज सईदचा तो निकतवर्तीय असल्याची माहिती आहे.

# महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका कायदेशीर तरतुदीनुसारच

## भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकानंतर मतदार यादी व मतदानप्रक्रियेवर करण्यात येत असलेल्या आरोपांना भारत निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाच्या स्पष्टीकरणानुसार, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची त्रुटी नसून, सर्व कायदेशीर तरतुदींनुसारच निवडणुका पार पडल्या आहेत.

आयोगाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत दर तासाला सरासरी ५८ लाख मतदारांनी मतदान केले. तथापि, शेवटच्या दोन तासांत अपेक्षित ११६ लाखांच्या तुलनेत केवळ ६५ लाख मतदारांनी मतदान केले, हे लक्षवेधी असले तरी त्यावरून कोणत्याही गैरप्रकाराचा निष्कर्ष काढता येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.

प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांकडून मतदानानंतर कोणतीही तक्रार अधिकृतपणे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निरीक्षकांकडे नोंदवण्यात आलेली नाही.

मतदार यादी संदर्भात आयोगाने सांगितले की, १९५० च्या लोकप्रतिनिधी अधिनियम व १९६० च्या मतदार नोंदणी नियमांनुसार तयार केली जाते. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो आणि अंतिम यादी सर्व पक्षांना उपलब्ध यादी करून दिली जाते.

याशिवाय, अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ ९० अपीले करण्यात आली, जी एकूण मतदार संख्येच्या तुलनेत अत्यल्प आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसकडूनही कोणतीही मोठी तक्रार नोंदवलेली नाही.

मतदान प्रक्रियेत १ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर ९७,३२५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सर्व पक्षांकडून १,०३,७२७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमले गेले होते. यामध्ये काँग्रेसच्या २७,०९९ बीएलएचा समावेश होता. त्यामुळे मतदार यादी संदर्भातील आरोप पूर्णपणे निराधार असून कायद्याचा अवमान करणारे असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

२४ डिसेंबर,२०२४ रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसला लेखी उत्तर दिले असून, ही माहिती आयोगाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. तरीही पुन्हा पुन्हा असे आरोप करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे अयोग्य असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

### क्रीडा कार्यालयाकडून ३४ खेळाचे उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यामध्ये खेळाचा प्रचार व प्रसार होणेसाठी खेळाडूंचा जास्तीत जास्त सहभाग व संघाची संख्या वाढवणे यावर लक्ष केंद्रीत करून चांगले खेळाडू तयार होण्यासाठी ८ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यासाठी जिल्हास्तरवर उन्हाळी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन खेळाडूंच्या शारीरिक क्षमता खेळांचे प्राथमिक कौशल्य विकास व खेळाची आवड निर्माण करण्यासाठी शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. खेळांचे प्राथमिक कौशल्य विकास व नवीन विद्यार्थी खेळाडूंना खेळाची आवड निर्माण पान २ वर

### परतूरातील विविध शासकीय कार्यालयात

# प्रभारी कारभार; जनतेचे हाल!

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथे गेल्या कित्येक वर्षांपासून सगळ्या कार्यालयात प्रभारी अधिकारी असल्याने जनतेचे बेहाल होत आहेत.

परतूर तालुका हा फार संपन्न तालुका म्हणून संबंध जिल्ह्यात परिचयाचा आहे,निम्मंन दुधना प्रकल्प असेल बागेश्वरी साखर कारखाना असेल विविध शैक्षणिक संस्था असतील, त्यामुळे इथे पंचायत समिती, तहसील कार्यालय, उप विभागीय कार्यालय, न्यायालय, गट साधन कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, जिल्हा परिषदेच्या सगळ्या कार्यालयाची भर परतूर शहरात आहे शिवाय पाटबंधारे विभागाचे कार्यालय आहेत, परंतु आजच्या मितीला कुणीही जबाबदार अधिकारी कुठल्याच कार्यालयात उपलब्ध नाही जवळपास २०० गावांचे शासकीय कामानिमित्त परतूर ला येतात अन् साहेब नाहीत म्हणून निराशा पान २ वर

### आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल तर्फे राष्ट्रपतींना तहसीलदारांमार्फत निवेदन

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील तहसीलदारामार्फत राष्ट्रपती यांनाकाश्मीर मधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर जिहादी मुस्लिम आतंकवादया कडून झालेल्या भ्याड हल्यात ३२ निष्पाप हिंदूच्या हत्येच्या निषेधार्थ राष्ट्रीय बजरंग दल तर्फे दि २३/०४/०२५ बुधवार रोजी सकाळी १० वाजेला तहसील कार्यलय पूर्णापूर( जाफराबाद)येथे आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल यांच्या कडून जाहीर निषेध करण्यात आला व तहसीलदार साहेबांना निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये राष्ट्रपती यांना विनंती करण्यात आली आहे की काश्मीरमध्ये पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यातील आतंकवादी यांना थोरात कठोर शिक्षा द्यावी. तसेच अशी शिक्षा



द्यावी की त्यांनी परत पुन्हा अशी कृत्य करू नये. हा तेथील पर्यटकारा नुसता हल्ला नसून संपूर्ण भारतातील लोकांवर हल्ला आहे असं निवेदनात उल्लेख करण्यात आलेला आहे. भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असाही उल्लेख करण्यात आलेला आहे. भ्याड हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या च्या कुटुंबाच्या दुःखामध्ये आम्ही सर्वजण सहभागी आहोत. तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले त्यावर, अविनाश देशमाने प्रांत उपाध्यक्ष राष्ट्रीय बजरंग दल, जालना जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रीय बजरंग दल पंकज काबरा, पान २ वर

### काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांसाठी ‘राज्य आपत्ती व्यवस्थापन’च्या हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन

संपर्क क्रमांक :- ०२२-२२०२७९९०

**मुंबई । प्रतिनिधी -** पहेलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मीरच्या विविध भागात अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक आणि त्यांचे नातेवाईक यांच्या मदतीसाठी मंत्रालयातील महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या ०२२-२२०२७९९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन, करण्यात आले आहे.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष संपूर्ण वेळ (२४७) कार्यरत आहे. या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह श्रीनगरवरून मुंबई येथे आज आणण्यात येणार आहेत. आज दुपारी श्रीनगर येथून महाराष्ट्रातील आणि गुजरातमधील मृतदेह विमानाने मुंबई विमानतळावर येणार आहेत. तेथून हे मृतदेह म्बुलन्सद्वारे त्यांच्या गावी पाठविण्यात येणार आहेत. यासाठीची सर्व प्रकारची मदत राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे. काश्मीरमध्ये अडकलेले पर्यटक आणि राज्यातील त्यांचे नातेवाईक यांनी मदतीसाठी ०२२-२२०२७९९० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात आले आहे.

श्रीनगर जिल्हा प्रशासनाने पर्यटकांना आपत्कालिन परिस्थिती संपर्क साधता यावा यासाठी श्रीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात २४x७ मदत कक्ष / आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

१) दूरध्वनी : ०१९४-२४८३६५१, ०१९४-२४६३६५१, ०१९४-२४५७५४३
२) व्हॉट्सॲप : ७००६०५८६२३, ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७

युवा आदर्श

### वाचनालय ...

पुस्तके ग्रंथ रूपात
भोवती निर्मी वलय
ज्ञान अथांग सागर
ठेवा असे ग्रंथालय
वाचनाची माणसाले
रे सांस्कृतिक सवय
भोजनां समान भूक
पुस्तक एखादं हवयं
मित्रासम रमे वाचक
होईनि जातो तन्मय
विविधांगी विषयांत
आनंद लाभे चिन्मय
अस्तित्वाची लढाई
लढतेयं वाचनालय
लुप्त होईलं ठेवा रे
सतावत आहे भय
मोबाईलमध्ये लाभे
मागालं तसे विषय
असंख्य कमळफुले
भरले पूर्ण जलाशय
वाचनालयां जावया
नाही कुणास समय
ग्रंथा लागली वाळवी
रस्ते झाले तमो मय
पुरातन स्मारकासम
होतीलं ती ग्रंथालय
पलटावे भाग्य आता
द्यावे कुणीतर अभय

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

## संपादकीय

### क्रिकेटच्या देवाचा वाढदिवस



क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५२ वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धावांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे. २००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले. सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही. आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर , सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मविभूषण या पुरस्करांनी त्याला गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य. १४० कोटी भारतीयांना आनंद साजरा करण्याची संधी सातत्याने निर्माण करुन देणाऱ्या या क्रिकेटच्या देवाला ५२ व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# हिंदी भाषेची सक्ती नंतर; प्रथम मराठी शाळा तंदुरुस्त करून संपूर्ण शिक्षण मोफत करा

राज्यात काय चालुय समजत नाही कधी भाषेचा मुद्दा तर कधी धर्माच्या नावावर उलटसुलट चर्चा यामुळे संपूर्ण राजकारण्यांना बोलायला व राजकारण करायला भरपूर वेळ मिळतो आणि त्यांची राजकीय पोळी शेकल्या जाते.परंतु यात सर्वसामान्य, गरीब व शेतकरी भरडल्या जातो त्याचे काय? राज्यात अनेक जटील समस्या आहेत.महागाई, पिण्याच्या पाण्याची समस्या,आरोग्य विषयक समस्या,मूलभूत समस्या, बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, शेतकऱ्यांच्या आत्महत्या,बेरोजगारीची समस्या, वृक्षलागवड अश्या अनेक गंभीर समस्या आजही राज्यात आहेत.त्याकडे सरकार लक्ष न देता नवीन-नवीन मुद्दे उपस्थित करून सरकारने सर्वसामान्य,गरीब व शेतकऱ्यांची दिशाभूल करू नये.हिंदी भाषेच्या सक्तीच्या मुद्यापेक्षा इंग्रजी भाषेला हद्दपार करायला पाहिजे त्याबद्दल पक्षविपक्ष का बोलत नाही?आज राजकीय पुढाऱ्यांचे मुलंमुली इंग्रजी शाळेत मोठ्या जोमाने शिकतात आणि मोठ्या स्वाभिमानाने सांगतात की माझा मुलगा-मुलगी या शाळेत शिकत आहे त्या शाळेत शिकत आहे आणि महत्त्वाचे म्हणजे इंग्रजीच्या नादात आपल्या आपल्या नात्यांमध्ये विष घोळल्या गेले त्याकडे कोणाचेच लक्ष नाही. आई-बाबा,मावशी, मामा- मामी,काका-काकु, आजी-आजोबा हे शब्द जनुकाय नामशेष होत आहे की काय असे वाटत आहे.कारण आता राज्यात इंग्रजी भाषेने घर केल्याने मम्मी-पप्पा, अंकल-अंटी, ग्रँडफादर-ग्रँडमदर असे शब्द कानावर येतात म्हणजे यात मराठी आणि हिंदीचा काहीच वाद नसतांना इंग्रजी प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसते यावर सरकार लक्ष का घालत नाही! राजकीय पुढारी व पुंजीपती वर्ग आपल्या मुलामुलींना उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठवितात तेव्हा राजकीय पुढाऱ्यांना इंग्रजी चालते हे कस काय! सरकारने हे लक्षात ठेवायला पाहिजे की आपली मातृभाषा ही मराठी आहे कारण ही जन्मताच अवगत असते ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.प्रश्न रहाला हिंदी भाषेचा याबद्दल राज्यासह देशाला कल्पना आहे की हिंदी भाषा आपली राष्ट्रीय भाषा आहे मग राज्यात हिंदी भाषेची सक्ती आलीच कोठुन! राज्यात हिंदी भाषेची सक्ती पहिली पासुन करने म्हणजे मातृभाषेच्या मुळावर घाव करण्यासारखे होईल. शिक्षणाच्या बाबतीत आतापर्यंत भाषेविषयी जे धोरण होते तेच पुढे ठेवले पाहिजे यात कोणताही बदल करू नये.सरकारला शिक्षणाच्या बाबतीत धोरण बोलावयाचे असेल तर संपूर्ण इंग्रजी शाळांमध्ये मराठी भाषेची सक्ती करावी व संपूर्ण शाळांचे या बाबतीत ऑडिट घ्यावे.आज महाराष्ट्राची राजधानी आणि देशांची उपराजधानी मुंबई आहे सोबतच देशाची औद्योगिक राजधानी सुध्दा आहे या ठिकाणी दररोज करोडोंची उलाढाल होत असते.तरी तेथील उच्च पदस्थ, सेलिब्रिटी, राजकीय पुढारी इंग्रजी भाषेचा वापर करतात ही बाब सर्वांनाच ग्यात आहे व रोज आपण सोशल मीडियावर पहात सुध्दा असतो. तेव्हा त्यांच्या मुसक्या का आवळल्या जात नाही! आपला जन्म याच मातीत झाला आपण स्वाभिमानाने मराठी बोलुच यात दुमत नाही.परंतु राज्यात परप्रांतीय व्यवसाय करीत आहे, उद्योगधंदे चालवित आहेत,नौकरी करीत आहे व मोठ्या प्रमाणात पैसा कमवीत आहे ते आजही इंग्रजी किंवा हिंदी भाषेचा किंवा स्वतःच्या मातृभाषेचा वापर करतात त्यांच्यावर सरकारने लगाम कसली पाहिजे व यांच्यावर मराठी भाषेची सक्ती केली पाहिजे.आज राज्यात अनेक मराठी शाळा धुळ खात आहेत त्यांना दुरूस्त करून सरकारने सुसज्जीत केले पाहिजे. सरकारने पहिलीपासून हिंदीसक्ती करण्याचा निर्णय घेतला होता.परंतु राज्यात मोठ्या प्रमाणात विरोध पहाता सरकारने हा निर्णय मागे घेतला.परंतु सरकारने असे चुकीचे निर्णय का घ्यावेत!ज्यामुळे मराठी माणसाला ठेच पोहचेल.सरकारने सर्वप्रथम सरकारी शाळा व रूग्णालयाकडे जातीने लक्ष देऊन त्यात दुरुस्ती करावी व पक्ष-विपक्षाच्या आजीमाजी राजकीय पुढाऱ्यांनी एक पाऊल पुढे टाकुन आपल्या मुलांना सरकारी शाळांमध्ये शिक्षणाकरीता पाठविले तर अती उत्तम होईल. कारण यामुळे सरकार सरकारी शाळांकडे जातीने लक्ष केंद्रित करेल. सरकारला शिक्षण व्यवस्थेत बदल करायचाच असेल तर सर्वप्रथम खाजगी कोचिंग क्लासेसचा बाजार थांबवून त्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे.त्याचप्रमाणे खाजगी शाळां-महाविद्यालयांनी दरवर्षी फी वाढीचा जो सपाटा लावुन शिक्षणाचा बाजार मांडला आहे त्यावर सरकारने जर लगाम कसली तर राज्याच्या १३ करोड जनतेचे कल्याण अवश्य होईल. त्यामुळे सरकारने दिशाभूल करणारे किंवा चुकीचे निर्णय न घेता शिक्षण,आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध करून द्याव्यात व महागाईने जे आक्राळविक्राळ रूप धारण केले आहे त्यावर नियंत्रण ठेवुन अंकुश लावावा आणि गरीब, सर्वसामान्यांना दिलासा द्यावा.बदलत्या हवामानामुळे देशासह राज्यात सुर्य आग ओकत आहे आणि देशात सर्वात हॉट शहराची तुलना नागपूरची म्हणजेच महाराष्ट्राची झाली आहे याकरीता मी सरकारला विनंती करेल की शिक्षणाच्या माध्यमातून वृक्ष लागवडीची सक्ती करावी याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल व सर्वच याचे आनंदाने पालन करेल आणि याचा फायदा मानव,पशुपक्षी व संपूर्ण सृष्टीला होईल.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# व्यसनाची भूक कमी करूया; ज्ञानाची भूक वाढवूया...

आजकाल तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण फार वाढले आहे. आणि पुस्तकांच्या वाचनाचे प्रमाण फार कमी झाले आहे. वाईट व्यसनाने माणूस माणसातून उठतो तर पुस्तकांच्या वाचनाने माणूस माणसात येतो. असे म्हटले जाते. हे काय खोटे नाही. कारण आजकालचा माणूस चांगले व्यसन करण्यापेक्षा, वाईट व्यसनाच्या आहारी पटकन जात आहे. आणि स्वतःच्या जीवनाला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढत आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात व्यसनी तरुणांचे प्रमाण अधिक वाढले आहे. कारण ग्रामीण भागातील तरुण-तरुणी आई-वडिलांच्या धाकात असतात. आणि शहरी भागातील तरुण-तरुणी मोकाट कुत्र्यांसारखे बोंबलत फिरतात. त्यांना आई-वडील शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. पण हे मोकाट तरुण-तरुणी शिक्षणाच्या नावाखाली व्यसनाचा बाजार मांडतात. आई-वडिलांकडून व भावांकडून शिक्षणासाठी दर महिन्याला पैसे उकळतात. आणि मोठ्या ढाब्यावर जाऊन व्यसन व जेवण करतात. महागड्या किंमतीची वाईन पितात. सोबत सिगारेटचा धूर काढतात. आणि चंगळवादी जीवन जगतात. व्यसन करण्याच्या बाबतीत मुलीही काही कमी नाहीत. तर त्या मुलांपेक्षा एक पाऊल पुढेच आहेत. शहरी भागात मुलांपेक्षा मुलींचे व्यसन करण्याचे प्रमाण अधिक असल्याचे चित्र सध्या समोर येत आहे.

आजकाल तर काही महाभाग कॉलेजला जाताना बॅगमध्ये नावालाच एक पेन आणि वही घेऊन जात आहेत. आणि बाकी बॅग मध्ये सिगारेटचे पॉकेट, गुटख्याच्या पुड्या व दारूच्या बॉटल सोबत घेऊन जात आहेत. आणि शाळेतील मोकळ्या मैदानावर किंवा वर्गातील बाकावर बसून दारू पीत पीत सिगारेटचा धूर काढत असतात. वर्गामध्ये गुटखे व तंबाखू खाऊन तिथेच पचकन पिचकाऱ्या मारतात. त्यामुळे कॉलेजला महाविद्यालय म्हणावे की? व्यसनालय म्हणावे? हेच कळत नाही. म्हणून प्रत्येक कॉलेजमध्ये व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणाईचा प्रचंड बोलबाला आहे. असली बेवडी तरुणाई आपल्या शिक्षकांसोबत वाद-विवाद करायला ही मागे पुढे पाहत नाही. काही काही तरुण तर नशेच्या भरात शिक्षकांना व मुलींना भलतेच काहीतरी बोलून ठेवतात. अशा निर्लज्ज व निसाक तरुणांना आपण शिक्षकांना वाईट बोललो याचे काहीच दुःख व खंत वाटत नाही.

कारण अशा निसाक व बेवड्या तरुणांना बालवयात कुठेतरी आई-वडिलांचे व शाळेतील शिक्षकांचे संस्कार कमी पडलेत असेच म्हणावे लागेल. कारण सुसंस्कारी व अभ्यासू मुले शिक्षकांना कधीच वाईट व उद्धट बोलत नाहीत. कारण त्यांना त्यांचे सुसंस्कार तसे उद्धट व वात्रट बोलू देत नाहीत. ते नेहमी अभ्यासात व वाचनात गर्क राहतात. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून जोमाने अभ्यास व वाचन करतात. पण आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता फार कमी झाली आहे. म्हणून सध्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे व वाचनाचे महत्त्व पटवून देणे व त्यांची संख्या वाढवणे सध्या काळाची नितांत गरज बनली आहे.

ज्ञानाचे, समतेचे व मानवतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तरुणांना वाचाल तर वाचाल असे उद्देशून म्हटले होते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ज्ञानाची इतकी प्रचंड भूक होती की, त्यांनी विद्यार्थी दशेत सतत अठरा-अठरा तास वाचन व चिंतन करून ज्ञानाची भूक भागवली. म्हणून त्यांना आदराने ज्ञानाचे प्रतीक असे म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी दशेत सतत अठरा-अठरा तास वाचन व चिंतन करायचे. तर मग आपण त्यांच्यापेक्षा कमी नऊ तास वाचन का करू शकत नाही?

कारण इथून पुढे वाचणारेच वाचणार आहेत. आणि बाकीचे अलगद फसणार आहेत. म्हणून तरुणांनो आपण आता व्यसनाची भूक कमी करून वाचनाच्या माध्यमातून ज्ञानाची भूक वाढवायला हवी. आपोआपच आपली विचारधारा वाढेल. त्यासाठी आपण स्वतःला पुस्तकांच्या विश्वात घेऊन गेलं पाहिजे. आणि चांगल्या व निर्मळ विचारांच्या पुस्तकांचे सखोल वाचन केले पाहिजे. त्यासाठी आपण थोर महापुरुषांची व विचारवंतांची जीवन चरित्रे, आत्मचरित्रे, कथासंग्रह, काव्यसंग्रह, कादंबऱ्या व उपन्यास वाचून ज्ञानाची भूक वाढवली पाहिजे. कारण माणूस मरेपर्यंत विद्यार्थीच राहतो. ज्ञान हे अथांग सागरा एवढे आहे. त्याच्या खोलीचा अंदाज कोणालाच लावता येऊ शकत नाही. म्हणून तरुणांनी शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत वाचन व चिंतन केले पाहिजे. वाचनाने आपली बुद्धी प्रगल्भ होऊन स्मरणशक्ती व वैचारिक पातळी वाढते. म्हणून लहान असो या थोर प्रत्येकाने पुस्तकांचे वाचन केलेच पाहिजे. वाचन करण्यासाठी आपल्याला वयोमर्यादा नाही. हे लक्षात ठेवून आपण संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, साने गुरुजी, डॉ. नरेंद्र दाभोलकर व वेगवेगळ्या महापुरुषांनी लिहिलेल्या विविध पुस्तकांचे वाचन करणे ही सध्या काळाची गरज बनली आहे.

कारण हल्ली पुस्तकाचे वाचन फार कमी झाले आहे. आणि व्यसनाचे प्रमाण खूप वाढले आहे. सध्या मोबाईलचा जमाना आहे. माणूस पुस्तकांपेक्षा मोबाईल मध्ये जास्त लक्ष केंद्रित करत आहे. मोबाईलचा अतिवापर हे एक तरुणांना फार मोठे व्यसनच जडले आहे. मोबाईल मध्ये भरमसाठ इंटरनेट डेटा असतो. आमची मोबाईल वेडी मुले गुगलच्या माध्यमातून मोबाईलवर नको त्या गोष्टी सर्च करून बघतात. मोबाईलचे व्यसन जेवढे चांगले आहे, तेवढेच वाईट देखील आहे. त्याचा चांगला फायदा करायचा की वाईट? हे आपल्या हातात आहे. पण माणूस चांगली गोष्ट सोडून वाईट गोष्टीकडे लवकर वळला जातो. आणि इथेच माणसाच्या आयुष्याचा सत्यानाश होऊन बसतो. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आणि लवकरात लवकर ग्रंथालयाची वाट धरली पाहिजे. ग्रंथालयातील एका पेक्षा एक दर्जेदार पुस्तके वाचून आपली ज्ञानाची कक्षा रुंदावली पाहिजे. सध्या ग्रंथालयातील पुस्तकांवर धूळ साचली आहे. वाचकांविना ग्रंथालय ओस पडली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके आपली वाट पाहत आहेत. चला तर मग मित्रहो व्यसनाची भूक कमी करूया आणि ज्ञानाची भूक वाढवूया....

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी,**
**ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# मंठा तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**मंठा । प्रतिनिधी -** तहसील कार्यालय येथे मंठा तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग सरपंच पदाचे आरक्षण सोडत सभा मंठा तहसिलदार सोनाली जोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला नायब तहसिलदार काळदाते सर यांच्यासह मंठा तालुक्यातील विविध गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंठा तालुक्यातील एकुण ९२ ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण सन २०२५-३० या कालावधी करीता खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.

अनुसूचित प्रवर्ग १५: अनुसूचित जाती प्रवर्गातील आरक्षित गावांमध्ये हिवरखेडा, खोराड सावंगी, पाकणी,देवठाणा, पाटोदा बुद्रुक, हेलसवाडी, लिबेवडगाव, अनुसूचित जाती महिला मंगरूळ, जयपूर, दहा, बेलोरा, देवगाव खवणे, पिपरखेडा खराबे, पेवा/माळसावंगी (चिठ्ठीद्वारे), आणि लावणी (चिठ्ठीद्वारे) या गावांचा समावेश आहे.

अनुसूचित जाती प्रवर्ग २ अनुसूचित जमातींसाठी आरक्षित ग्रामपंचायती शिरपूर आणि माहोरा (महिला) ही आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्ग २५ नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित २५ ग्राम पंचायतींमध्ये रामतीर्थ, आरडा तोलाजी, धोंडी पिपळगाव, वैद्यवडगाव, लिबखेडा, एरांडेश्वर/कोकरसा, देवठाणा मंठा, उमरखेडा, विडोळी बुद्रुक, उस्वद (देवठाणा), आंधवाडी, वाघाळा, मेसखेडा, पांगरी खुर्द, केंधळी, टाकळखोपा, शिवनगीरी/पळसखेडा,वझर सरकटे, पाडळी दुधा, विडोळी खु., टोकवाडी, वडगाव सरहद, हातवन / आवलगाव, किर्तापूर/ किर्तापूर तांडा, नायगाव पया गावांचा समावेश आहे.

सर्वसाधारण प्रवर्ग ५० (२५ महिलांसाठी आरक्षित) सर्वसामान्य प्रवर्गातील आरक्षणांतर्गत ५० गावांचा समावेश आहे. यामध्ये अंभोरा जहागीर, पांगरा गडदे / किनखेडा,अंभोडा कदम, वाघोडा / वरुड, केहाळवडगाव, विरगव्हाण, वाटूर तांडा, किर्ला, लिबोना/ जाटखेडा, जांभरून तुपा, हेलस, गेवराई, माळतोंडी, वाढेगाव/पांढूर्णा, कर्णावळ, सोनुनकरवाडी, हनवतखेडा/ चिखली, माळकिणी, माळेगाव, कठाळा बु., खोरवड/मोहदरी, दहिफळ खंदारे, पोखरी केंधळे, कोकरंबा, ढोकसाळ, सर्वसाधारण महिला नानसी, पांगरीगोसावी, आर्डाखारी/खारी आर्डा, तळणी, इंचा, कानडी, पोखरी टकले, गारटेकी, दुधा/ सासखेडा, सावरगाव वायाळ, अंभोरा शेळके, बरबडा, ठेंगेवडगाव, तळेगाव, वाई, केदार वाकडी, कठाळा खुर्द/ कानफोडी, तळतोंडी / मुरूमखेडा, रानमळा वांजोळा, वाघोळा तांडा, पांगरी बुद्रुक, गुळखंड, आकनी, गुळखंड तांडा/मोसा या गावांचा समावेश आहे.

पान १ वरुन

### वाघा बॉर्डर ...

भारत सोडावा, ३- सिंधू जल करार स्थगित, ४- अटारी बॉर्डर बंद, ५- पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द

### प्रभारी कारभार ...

पोटी परत जातात त्यांच्या या पायपीटीला, आर्थिक हानीला जबाबदार कोण आहे? हा सगळा प्रकार थांबवून जबाबदार अधिकारी नेमावे आणि त्यांना पुर्ण वेळ जनतेसाठी द्यावा जेणेकरून जनतेची परवड होणार नाही, ही आग्रही भुमिका मी सामाजिक कार्यकर्त्या सविता कांबळे लवकरच जिल्हाधिकारी यांच्याकडे मांडणार आहे.

### क्रीडा कार्यालयाकडून ...

होण्यासाठी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी जालना यांच्या मार्फत खालील ठिकाणी दि. १ ते १५ मे २०२५ या कालावधीत सकाळी आणि सायंकाळी आयोजन करण्यात येत आहे. सदरील प्रशिक्षण शिबीरासाठी खेळ प्रमुख यांच्याकडे नाव नोंदविणे आवश्यक आहे. शिबीरात सहभागी होणाऱ्या सर्व खेळांडुना जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या मार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबीरात क्रीडा कार्यालयाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक व विविध खेळ संघटनांचे उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिरात सहभागासाठी खेळाडूंनी नाव नोंदणी करावी. नाव नोंदणीसाठी प्रमोद खरात ७९७२८९९३४८, एकनाथ सुरूशे ९०११८५४१९२, विजय गाडेकर ९२७१७८३३१३, नागेश व्हाडे ९५२९१३३४५९, विकास काळे ७३५०५९००७२, अमोल काटकर ९९२३८२०७५२ यांच्याशी संपर्क साधावा. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### आंतरराष्ट्रीय विश्व ...

बजरंग शैलेश, विनोद इंगळे सुनील गॅरंडवल, सागर इंगळे अनंता भंगाळे, दीपक उखर्डे अविनाश सपकाळ, जगन्नाथ शिंदे शंकर शिंदे, श्याम निकष ऋषिकेश बऱ्हाटे, निलेश अक्कर शुभम मिश्रा, दीपक ठाकूर, विनायक लोखंडे, संदीप अक्कर, रामेश्वर गावंडे विनोद जोशी, वैभव मगर आतिश शुक्ला, दीपक हिवाळे गणेश सोळंके, सचिन फटाले अक्षय गावंडे, अक्षय डोमळे, भरत बोराडे, कृष्णा उखर्डे कृष्णा आहेर, आकाश जाधव शंकर वाघ, श्रीकांत उखर्डे वैभव कुलकर्णी, सोहम आवटी शेखर आहेर, लक्ष्मण उखर्डे आदींच्या सह्या आहेत.

# रावसाहेब दानवे यांचा ड्रीम प्रोजेक्ट अंतिम टप्प्यात





**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा आणि लगतच्या विदर्भातील उद्योग, व्यापार व शेतकऱ्यांना देशांतर्गत तसेच परदेशांत मालाची सहजपणे अतिशय स्वस्त दरांत वाहतूक व्यवस्था असलेल्या ड्रायपोर्ट मल्टीमोड लॉजिस्टीक पार्क चे प्रत्यक्ष कामकाजाची माहिती आणि ड्रायपोर्ट परिसराला जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी व शेतकऱ्यांनी बुधवारी दि.२३ रोजी भेट देऊन पाहणी केली.

रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या सभागृहात आयोजित बैठकीत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते भास्कर पाटील दानवे यांनी मराठवाड्यातील सर्व उद्योजक, व्यापारी आणि शेतकरी ड्रायपोर्टचे प्रत्यक्ष काम काज लवकरात लवकर सुरू होण्याची प्रतिक्षेत आहेत असे सांगून तो सुवर्ण क्षण उगवला आहे असे म्हटले हा प्रकल्प संपूर्ण मराठवाड्याचे चित्र बदलण्याची क्षमता असलेला आहे असे दानवेंनी सांगितले माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या ड्रायपोर्टच्या उभारण्यात खूप प्रचंड मेहनत घेतली असून खर्या अर्थाने आता विकासाला गती मिळाली आहे असे ते म्हणाले. यावेळी जेष्ठ उद्योजक सुनील रायठठ्ठा, पोलाद स्टील चे संचालक नितीन काबरा, महीको चे संचालक रितेश मिश्रा, आयकॉन स्टील चे संचालक उषमेश राठी व अखिलेश राठी, कालिका स्टील चे संचालक गोविंद गोयल व गोपाल गोयल, लघुउद्योग भारती संघटनेचे अविनाश देशपांडे, नितीन बागडी, भारतीय जनता पक्षाचे महानगराध्यक्ष सतीश जाधव, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा संघठन मंत्री सिध्दीविनायक मुळे जिल्हा उपाध्यक्ष श्री.धनराज काबलीये मंडळ अध्यक्ष श्री.महेश निकम श्री.निवृत्ती लंके उपस्थित होते.

बैठकीचे सुत्रसंचलन अर्जुन गेही यांनी केले यावेळी राष्ट्रीय महामार्ग कार्पोरेशनचे उपाध्यक्ष राजकुमारसिंग चव्हाण, सहायक उपाध्यक्ष सुर्जितो मोहंतो आणि जालना ड्रायपोर्टचे टर्मिनल मॅनेजर विकास मलिक यांनी ड्रायपोर्ट संचलनासंदर्भात सविस्तर माहिती दिली उपस्थितांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

# अंतःकरणातील काम क्रोध लोभ हे मोठे शत्रू, परमात्म्यापर्यंत जावू देत नाहीत - डॉ प्रमोद कुमावत



**जालना । प्रतिनिधी -** कल्पना व अविद्या यामुळे जीवपदशा प्राप्त झाली आहे ही दुःखाला कारणीभूत आहे. प्रत्येक मनुष्य आज मानसिक दृष्ट्या कमकुवत व रिकामा दिसत आहे. या गोष्टीचा शोध घेतला असता लक्षात येते की माणसाच्या अंतःकरणांमध्ये काम क्रोध लोभ हे विकार या दुःखाला कारणीभूत आहेत. कामाने कर्माचा नाश होतो, क्रोधाने ज्ञानाचा नाश होतो, लोभाने भक्तीचा नाश होतो म्हणून हे तीनही त्याज्य केले पाहिजेत. काम क्रोध लोभ हे परमार्थ मार्गातील मोठे डाकू चोर लुटेरे आहेत. यांना ओलांडून पुढे गेल्याशिवाय परमात्म्याची प्राप्ती होणार नाही. विवेक वैराग्य शमदमादीषटक व मुमुक्षुत्व यांची जुळवाजुळव करून श्रीगुरूंना शरण गेल्याशिवाय व शुद्ध अंतकरणाने परमार्थ करून आपण परमानंदाला प्राप्त होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन वीरखेडा भालकी ता जाफराबाद येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात बोलताना डॉ.प्रमोद महाराज कुमावत यांनी केले.

पिकल्या शेंद कडूपण गेले, तैसे आम्हा केले पांडुरंगे, काम क्रोधलोभ निमाले ठाईची, सर्व आनंदाची प्राप्ती झाली, आठव नाठव गेले भावाभाव झाला स्वयमेव पांडुरंग, तुका म्हणे भाग्य या नावे म्हणीजे संसारी जन्मीचे याची लागी, या तुकाराम महाराजांच्या अभंगावर त्यांनी निरूपण केले. पुढे बोलताना ते म्हणाले आजकाल व्यवहारिक संपत्ती,पद,प्रतिष्ठा प्राप्त करण्यालाच लोक भाग्य असे समजतात. जगद्गुरु तुकाराम महाराजांनी भाग्य कशाला म्हणायचे याची व्याख्या या अभंगात केली, ती म्हणजे जीव दशा नाहीशी होणे हे खरे भाग्य, काम क्रोध लोभ नाहीसे होणे हे खरे भाग्य, ज्ञाना ज्ञानातीत होऊन ब्रह्मरूप होणे हे खरे भाग्य, परमार्थ सफल होणे हे खरं भाग्य आहे असे डॉ प्रमोद कुमावत म्हणाले. ज्ञान हे मुख्य साधन असून अज्ञान निवृत्ती हे त्याचे कार्य आहे आणि परमात्मा हा या दोन्हीच्या परे आहे.

ह भ प गुरुवर्य भगीरथ बाबा व ह भ प गुरुवर्य सोनुणे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली वीरखेडा भालकी या ठिकाणी या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मागील ३९ वर्षापासून या गावांमध्ये हा सप्ताह सुरू आहे. यावेळी ह भ प नारायण महाराज पिंपळे, ह भ प भाऊराव महाराज भालके, गायनाचार्य ह भ प अनिल महाराज देवडे, मृदंगाचार्य हभप जनार्दन बुवा यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

जाफराबाद तालुक्यातील ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत जाहीर

# टेंभूर्णीचे सरपंचपद ओबीसी पुरुषासाठी आरक्षित

जाफराबाद तालुका जिल्हा जालना सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाले. एकूण ८२ ग्रामपंचायतीच्या आरक्षण जाहीर झाले असून. ते पुढील पाच वर्षासाठी आहे. अनेक अनेक ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर झाल्याने भविष्यात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये त्या पद्धतीने आता आखणी करायला कार्यकर्त्यांची सुरुवात झाली आहे. सरपंच हा जनतेतून निवडल्या जाणार असल्याने अनेक जणांनी गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहे. अनेकांनी तर आता निवडणूक लढवायची असाही चंग बांधलेला असून, कार्यकर्त्याच बरोबर अनेक राजकीय पक्ष सुद्धा आता त्यातून आपलाच सरपंच कसा होईल याकडे लक्ष देत आहे. सर्वात मोठे ग्रामपंचायत टेंभुर्णी, या ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर झाले. नागरिकांचा मागास प्रवर्ग म्हणजे ओबीसी पुरुष गटासाठी हे आरक्षण सुटले असल्यामुळे आता इच्छुकांची उडी त्यावर असणार आहे. सर्व जनतेतून निवडून द्यायचा असल्याने कोणत्या सदस्याची गरज पडणार नाही यामुळे आता पुढे सात महिन्यांवर येऊ घातलेल्या निवडणुकाकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. सर्वांनीच आता याकडे आपले लक्ष केंद्रित करण्याकडे कल दिसत असून सर्वच समाज माध्यमावर याच्या प्रतिक्रिया उमटत आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गामध्ये अनेक जाती येत असून ते समाजही फार मोठमोठाले असल्यामुळे आताच निवडणुकांच्याकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन कसा असेल याचे आडाखे बांधायला आता सुरुवात. आज झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये पुढील प्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायतला आरक्षण सुटलेले आहे. अनुसूचित जाती महिला-- खानापूर, आंबेगाव, डोलखेडा खुर्द, हिवरा बळी, गोंधनखेडा, भारज खुर्द, अनुसूचित जाती पुरुष --- मेरखेडा, सोनगिरी, आडा, तोंडोळी, म्हसरूळ, चिंचखेडा, खासगाव. अनुसुचित जमाती महिला - कोळेगाव, अनुसूचित जमाती पुरुष - निमखेडा बुद्रुक. नागरिकांचा मागास प्रवर्ग ( ओबीसी ) महिला --- भातोडी, भारज बुद्रुक, माहोरा, जवखेडा ठेंग, आळंद, वानखेडा, ब्रह्मपुरी,पासोडी, पिंपळगाव कड, वरुड बुद्रुक,. नागरिकांचा मागास प्रवर्ग ( ओबीसी ) पुरुष -- शिराळा /वाढवणा, तपन गोंधन, डावरगाव, कुंभारी, नांदखेडा, सावरगाव मस्के, कोल्हापूर,येवता, टेंभुर्णी, सर्वसाधारण महिला -- आरादखेडा,, सिंधी, हिवराबळी/ हरपाळा, नळविहीरा, कोनड, सांजोळ, जानेफळ भराडखेडा/ सोनखेडा, अकोला देव, आसई, दहेगाव, पापळ, पोखरी, वीरखेडा भालकी / रेपाळा, देऊळझरी, टाकळी/ गारखेडा, देऊळगाव उगले/ पिंपळखुटा, बेलोरा,शिपोरा अंभोरा. सर्वसाधारण पुरुष -- बुटखेडा, सावंगी, डोणगाव, वरुड खुर्द, हनुमंत खेडा, सावरखेडा गोंधन, वडाळा,निवडुंगा, सातेफळ, खापरखेडा/ गोपी, वरखेडा विरो/ सावरखेडा, घानखेडा, काळेगाव, बोरगाव बुद्रुक /बोरगाव मठ/ बोरी खुर्द, चापनेर /धोंडखेडा, देवळेगव्हाण, कुंभारझरी, सवासणी, मंगरूळ /रूपखेडा/ डोलखेडा बुद्रुक.

जाहीर झालेल्या जाफराबाद तालुक्यातील आरक्षित गावाच्या यादीतील सर्वात मोठ्या टेम्भूर्णी गावात नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष गटाला जागा सुटल्याने इच्छुकांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गांची संख्याही टेंभुर्णी गावात जास्त असल्याने आता मात्र निवडणुकीची आखाडे टेंभुर्णी गावाचा विकास बाजूला ठेवून रंगताना दिसून येतील असे एका नागरिकाने नाव न सांगण्याच्या अटीवर बोलून दाखवले. अनेक समस्या उद्भवत असताना टेंभुर्णीचा पाणी प्रश्न, टेंभुर्णी गावातील रस्त्यांचा प्रश्न, टेंभुर्णी गावातील नाल्यांचा प्रश्न, नळांचे नियोजनाचा प्रश्न, टेंभुर्णी ते घाणीचे साम्राज्याचा प्रश्न, टेंभुर्णी गावातील बस स्थानकाचा प्रश्न, टेंभुर्णी गावात बसस्थानक आहें, पण तिथे बस येतच नाही, याचा सर्वात मोठा प्रश्न, तसेच ते बस स्थानक कोणाला चालवायला दिल्या जाते याचाही मोठा गंभीर प्रश्न असताना आता गावकऱ्यांचे मात्र निवडणुकीकडे लक्ष लागलेला असून विकास गेला खड्ड्यात निवडणुकांचे नियोजनात आता कार्यकर्ते व्यस्त राहतील नेते व्यस्त राहतील. गावकऱ्यांच्या प्रश्नाचा त्यांना विसर पडेल असेही तो नागरिक म्हणाला. टेंभुर्णी हे गाव तालुक्यात मोठी आहे आणि या मोठ्या तालुक्यातल्या गावाला लीडरशिप नसावी ही शोकांतिका आहे असंही तो नागरिक उद्विग्न होऊन म्हणाला. आमच्या गावाला हरिभाऊ मुळे सोपानराव पाटील, यांच्यासारखं राज्यस्तरावर नेतृत्व करणाऱ्या लोकांसारखे नेतृत्व मिळाले का? हा प्रश्न असून आजच्या टेंभुर्णीतील नेतृत्वाने त्याचा जरूर विचार करण्याची गरज आहे असेही तो नागरिक म्हणाला. फक्त निवडणुका आल्या त्या जिंकल्या तेव्हा निवडणुकीत उभे राहिले आणि त्यावेळेस विकासाच्या अना-भाकाघेतल्या हे सगळं बाजूला ठेवून निवडणुका आल्या तेव्हाच मात्र अशा गोष्टी दिसतात ही एक शोकांतिका असल्याची प्रतिक्रिया एक टेंभूर्णीकरांने दिली आहे.

# वाचा आणि समृद्ध व्हा ।

जागतिक पुस्तक दिवस म्हणून दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो. जागतिक पुस्तक दिन, ज्याला जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिवस किंवा आंतरराष्ट्रीय पुस्तक दिवस म्हणूनही ओळखले जाते, हा वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (णछएडउज) द्वारे आयोजित केलेला वार्षिक कार्यक्रम आहे. पहिला जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल १९९५ रोजी साजरा करण्यात आला.

जगप्रसिद्ध साहित्यिक विल्यम शेक्सपियर याचा २३ एप्रिल हा जन्मदिवस तसेच मृत्यू दिवसही आहे.

दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन भारतातही साजरा केला जातो. लोकांना पुस्तके वाचण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि जागृत करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

सध्या इंटरनेट या माध्यमामुळे बऱ्याच प्रमाणात तरुण पिढी पुस्तकापासून थोडी दूर जात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. प्रत्यक्ष पुस्तक हातात घेऊन वाचणे आणि इंटरनेटवर वाचन करणे यात खूप फरक आहे. प्रत्यक्ष पुस्तक वाचण्याचा आनंद हा वेगळाच असतो. लहान मुलांवर सुरुवातीपासून संस्कार करण्यासाठी त्यांना संत चरित्रे, ऐतिहासिक पुस्तके, थोरामोठ्यांची चरित्र-आत्मचरित्र हे वाचून दाखवली जातात. त्यातल्या गोष्टी सांगतात. त्यामागचा उद्देश हाच असतो. पुढील काळात त्यांनाही ही पुस्तके वाचण्याची इच्छा व्हावी. त्यातूनच त्याचे मनावर संस्कार व्हावे.

वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचवण्यासाठी आणि वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी म्हणून १९७५ -७६ सुमारास दिनकर गांगल, कुमार केतकर, अरुण साधू, अशोक जैन,प्र.ना.परांजपे, या मान्यवर मंडळीने ग्रंथाली वाचक चळवळीची स्थापना करून महाराष्ट्रभरात अगदी तालुका पातळी पर्यंत ही चळवळ पोहोचवली. आणि तीही स्वस्त दरात तसेच पुस्तक वाचका पर्यंत पोहोचवण्यासाठी नवीन नवीन प्रयोग केले. त्यात ग्रंथजत्रा, ग्रंथ मोहोळ,महाराष्ट्रात एकाचवेळी पन्नास ठिकाणी पुस्तक प्रदर्शन तेंडुलकरांची संवाद यात्रा, बाल झुंबड,वाचकदिन यासारखे अनेक प्रयोग होते. आणि त्यातून खूप मोठ्या प्रमाणात वाचकांचा प्रतिसाद मिळाला. तसेच ढवळे ग्रंथ यात्रा, अक्षरधारा ची पुस्तक प्रदर्शने, याद्वारे प्रयत्न झालेत. त्याचबरोबर नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठान तर्फे विश्वस्त विनायक रानडे यांनी बारा वर्षापासून सुरू केलेला ग्रंथ तुमच्या दारी हा नवीन प्रयोग. जवळपास ५0हजारांहून अधिक वाचक याच्यात जोडलेले आहेत. पंधरा देशात दोन ते अडीच कोटी रुपयांची एक लाखापेक्षा जास्त पुस्तके त्यात आहेत. तीस ते पस्तीस व्यक्तीच्या गटास ही पुस्तकांची पेटी मिळू शकते. आतापर्यंत जवळपास दोन हजार पेट्यांचे वर वितरण झाले आहे. तसेच आपण वाढदिवस, स्मृतिदिन साजरे करतो, त्यानिमित्ताने १000 रुपये देऊन अशी पेटी दान करु शकतो.. एका चांगल्या कामाला आपण हातभार लावू शकतो. पुणे मध्ये १00 च्या जवळपास या पेट्यांची संख्या आहे. मराठी वाचक जेथे, ग्रंथ तुमच्या दारी तेथे.... अशाप्रकारे कार्य सुरू आहे.

पुंडलिक पै यांची डोंबिवली येथील पै फ्रेंड्स लायब्ररी. ही सुद्धा वाचकांसाठी नवनवीन कार्यक्रम करून वाचन संस्कृती वाढीस मोलाचे योगदान देत आहे. जवळपास दीड ते दोन लाख पुस्तके त्यांच्याकडे आहेत. लहान मुलांसाठी स्वतंत्र विभाग आहे. त्यांच्या सहासात शाखा आहेत.

त्याच बरोबर बदलापूर येथील श्याम जोशी यांचे ग्रंथसखा वाचनालय याचाही उल्लेख करावा लागेल. त्यांनीसुद्धा सुरुवातीला व्यक्तीगत भांडवलातून हे वाचनालय सुरू केले. आज त्यांच्याकडे ६0 ते ७0 हजार मराठी ग्रंथ आहेत. आणि एक चांगले वाचनालय म्हणून नावारूपाला आले आहे.

डोंबिवली, ठाणे, मुंबई, पुणे, आदी ठिकाणी काही वाचनालया मार्फत पुस्तक आदान प्रदान कार्यक्रम केला जातो त्यात आपल्या जवळचे वाचलेले पुस्तक देऊन जे पुस्तक वाचले नाहीत ते घेऊन जायचे.

अजून एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अनेक जण वैयक्तिक पातळीवर वाचनासाठी प्रयत्न करीत आहेत. अश्याच माझ्या वाचनात काही गोष्टी आल्या त्या नमूद करतो.

सोलापूर जिल्ह्यामध्ये काशीराम कोळी नावाचा तरुण बैलगाडीत पुस्तक घेऊन फिरतो. बैलगाडीतच फिरते वाचनालय सुरू केले आहे. गावोगावी तो पुस्तके घेऊन फिरतो. आणि लोकांना वाचायला प्रवृत्त करतो. त्याच्या गाडीमध्ये जवळपास पाचशे सहाशे पुस्तके असतात.

अकोला शहरात गजानन नारे यांचेही असे फिरते वाचनालय आहे. मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून ते पुस्तकाची गाडी घेऊन फिरतात. विद्यार्थीदशेतच वाचनाची आवड निर्माण व्हावी हा प्रमाणिक हेतू आहे असे ते सांगतात. अशी ही साहित्यप्रेमी मंडळी सुद्धा सेवा करून वाचन संस्कृती रुजवत आहे ही खरोखरच अतिशय समाधानाची,कौतुकास्पद गोष्ट आहे.

जीवन इंगळे यांची लहानाबरोबर मोठयांनी पुस्तके वाचावे हीच त्यांची तळमळ आहे. आणि म्हणून पुणे आणि सातारा जिल्ह्यातील अनेक गावांना त्यांनी भेट दिली आहे. पुस्तके ही सर्वात जवळची मित्र असतात आणि त्यांचे सानिध्यात राहिलो तर आपण विचारांनी समृद्ध होऊ अशी त्यांची भावना आहे.

विदर्भातील वर्धा येथे सचिन सावरकर हे शिक्षक, पुस्तक दोस्ती जागर म्हणून कल्पना पुढे आणली आहे. पाच ते वीस वर्षे वयोगटातील बालक व युवकांना एकत्र आणून त्यांना पुस्तके वाचायला द्यायची आणि युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करायची. वाचन हा संस्कार असून लहानपणापासून मुलांवर रुजवण्याची गरज आहे ही त्यांची त्यामागची भूमिका आहे. या कामात त्यांना अजून काही शिक्षकांचे सहकार्य आहे.

तामिळनाडू मध्ये एका केशकर्तनायात वाचनालय सुरू केल्याची बातमी वाचली होती. त्याच्या केशकर्तनालयात आठशे पन्नास पुस्तके आहेत. पुस्तक वाचून प्रामाणिक प्रतिक्रिया दिली तर ग्राहकाला तो ३0 टक्के सवलत देतो. पुस्तक हा आपला चांगला सहकारी आहे असेच म्हणतो व आपल्या केशकर्तनालयात प्रतिक्षेत असलेल्यांना तो रिकामा वेळ जाऊ नये म्हणून पुस्तक हातात देतो. बघा म्हणजे मोठ्या प्रमाणा पासून तर लहान प्रमाणात वाचन वृद्धि व्हावी म्हणून किती प्रयत्न केले जातात..

मध्यंतरी एक लेख वाचण्यात आला होता त्यात जर्मनीची पुस्तक विषय माहिती होती. त्यात म्हटले होते-...

जर्मनीमध्ये रस्त्याने पुस्तकांची कपाट असतात. त्या प्रत्येक कपाटात साधारणता दोनशे ते अडीचशे पुस्तके असतात. रस्त्याने जाणारा येणारा त्यातून पुस्तक घेऊ शकतो. कृपया तुमच्या आवडीची पुस्तके घ्या आणि योग्य वेळी ती परत करा, नवीन पुस्तकांची भर घातल्यास स्वागत आहे.अशी पाटी लिहिलेली असते. पुस्तकांनी सजलेली श्रीमंत घरच मला येथे अधिक भेटली असे लेखात लेखिकेने नमूद केले आहे.

नासिक येथे ओझर विमानतळ रस्त्याने द रिलॅक्स कॉर्नर नावाचे हॉटेल रेस्टॉरंट आहे. विशेष म्हणजे या रेस्टॉरंट मध्ये वाचनालय आहे. हेतू हा की जेवणाबरोबरच येथे वाचनाची भूक भागवली जाते.निरनिराळ्या विषयावरची पुष्कळ पुस्तके या ठिकाणी आहेत. जेणेकरून जेवणाच्या आधी किंवा जेवणाच्या नंतर जो वेळ घालवतो त्या वेळात पुस्तक वाचावे, हाताळावे. हे रेस्टॉरंट भिमाबाई जोंधळे आणि त्यांचा मुलगा प्रवीण जोंधळे हे चालवतात. वेळ मिळेल तसे वाचनाचे महत्त्व ही सांगतात. या ठिकाणी झणझणीत झुणका पिठले, भाकरी, ठेचा, विशेष करून आहे. अनेक मान्यवरांनी भेट दिली आहे तसेच प्रवासीही या ठिकाणी थांबून जेवण करुन पुस्तक वाचनाचा लाभ घेतात. मुंबईमध्ये महानगरपालिका मार्फत झोपडपट्टी तेथे वाचनालय हे संकल्पना राबवली जाते.

पुण्यात चपराक प्रकाशन अनेक नवनवीन विषयावर नवनवीन लेखकांची पुस्तके प्रकाशित करित आहे. महाराष्ट्र सरकारने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पुस्तकाचे गाव ही संकल्पना राबवण्याचे ठरवले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात तसेच नवेगाव बांध, आंबेजोगाई,केशवसुत स्मारक मालगुंड अशा काही ठिकाणी पुस्तकाच्या गावासाठी निवड झाली आहे. आदेशही निघाले आहेत व अजून गावांची निवड करण्याचे काम सुरू आहे.

आज महाराष्ट्रात मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यम वर्गात परिस्थिती बघितली तर घराघरांमधून मराठी शिकणार्या मुलांचे प्रमाण कमी होते आहे. दुसरे म्हणजे पुस्तक खरेदीला आखडता हात घेतला जातो. मॉलमध्ये खरेदी हॉटेलमध्ये जेवण, वाढदिवस पार्टी यावर हजारांनी रुपये खर्च करतो पण दोनशे,अडिचशे रुपयाचे पुस्तक घ्यायला मागेपुढे बघतो. ही परिस्थिती नाकारून चालणार नाही. साहित्य संमेलनात पुस्तक खरेदी करणारा एक विशिष्ट वर्ग असतो. बाकी विंडो शॉपिंग करतात.

आपण थोरामोठ्यांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करतो,(रस्त्याला) मार्गाला त्यांचे नाव देतो,पण त्यांनी सांगितलेला मार्गाने जात नाही. त्यांचे साहित्य आहे ते वाचत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पुस्तकाविषयी फार प्रेम होते. ज्यावेळी त्यांच्याकडे पुस्तक खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते त्यावेळी ते ग्रंथालय उघडे त्यावेळी जात, व त्याची वेळ संपेपर्यंत तिचे वाचन करीत. नंतरच्या काळात मुंबई दादर येथील राजगुरू याठिकाणी बाबासाहेबांनी पन्नास हजार अधिक पुस्तकांचा संग्रह केला होता. आणि जगातील हे त्यांचे सर्वात मोठे व्यक्तिगत ग्रंथालय होते. त्यात विविध भाषांमधील ग्रंथाचा समावेश आहे. त्यांच्या वाचाल तर वाचाल या विचाराने अनेकांना प्रेरणा मिळाली. बाबासाहेब नेहमी म्हणत 'तुमच्याकडे दोन रुपये असतील तर त्यातील एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक तुम्हाला कसे जगावे हे शिकवेल. आज आपण बाबासाहेबांची जयंती पुण्यतिथी साजरी करतो प्रत्येक कार्यक्रमात त्यांचा उल्लेख करतो परंतु त्यांचे हे कार्य समोर आणणे सगळ्यांना माहीत करून देणे ही सुद्धा काळाची गरज आहे.

आता काही शहरात जसे पुणे, मुंबई ,सातारा अशा ठिकाणी पुस्तक महोत्सवाचे आयोजन केले गेले आणि त्यातून पुस्तक प्रकाशन आणि वाचन या दोन्ही गोष्टी साध्य केल्या गेल्यात.

आपण असं वाचन करू या, यातूनही स्फूर्ती व प्रेरणा मिळेल व जगण्याचे नवीन मार्ग सापडतील. मुलांमध्ये संस्काराचे बीज पेरल जाईल. सकारात्मक विचार मिळेल, अशाच वाचनाची गरज आहे. वाचाल तर समृद्ध व्हाल .तेव्हा खूपच चांगल आणि सकस वाचा. आपल्या जाणिवा समृद्ध करा.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव**
**मोबा.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

# सरपंचांवर मनमानी कारभाराचे आरोप

## चित्तोडा ग्रामपंचायतच्या उपसरपंच-सदस्यांचा राजीनामा

**जालना । प्रतिनिधी -** बदनापूर तालुक्यातील चित्तोडा ग्रामपंचायत मध्ये आता नव्या वादाला तोंड फ ुटले आहे. या ग्रामपंचायतीमधील सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्यात धुसफूस सुरू होती. त्यानंतर आता थेट चित्तोडा ग्रामपंचायतचे सरपंच सुभाष डिघे यांच्यावर मनमानी कारभाराचा व भ्रष्टाचाराचे आरोप करीत उपसरपंचांसह सदस्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राजीनामा देणारे दोन्ही सदस्य ह्या महिला असल्याने जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे.

चित्तोडा ग्रामपंचायतचे सरपंच सुभाष डिघे यांचा मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मासिक बैठकीस न बोलावणे, ठरावादरम्यान विश्वासात न घेणे, बोगस सह्या करणे असे गंभीर आरोप उपसरपंच सखुबाई संजय डिघे पाटील यांनी केले आहेत. महत्त्वाचे म्हणजे आपण महिला असल्या कारणाने पुरूष सरपंच नेहेमीच तिरस्कार करत असल्याचा गंभीर आरोपही माध्यमांशी बोलतांना सखुबाई डिघे यांनी केला आहे. सदस्य रंजनाबाई बाबासाहेब डिघे पाटील यांनीही सदस्य पदाचा राजीनामा दिला असून त्यांनीही सरपंचांवर गंभीर आरोप केले आहेत.

बदनापूर तालुक्यातील चित्तोडा ग्रामपंचायतीत एकूण सात सदस्य आहेत. जात पडताळणीमुळे तीन पदे रिक्त होती. उर्वरित चार पैकी दोन म्हणजे उपसरपंच सखुबाई डिघे व सदस्य रंजनाबाई डिघे यांनी बदनापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे रितसर राजीनामा दाखल केला असल्याने आता या ग्रामपंचायतीत केवळ दोन सदस्य राहिले आहेत.

# मानवा तुझं आहे तुझं पाशी पण मार्ग विसरलाशी - सुप्रसिद्ध संमोहनतज्ञ नांदेडकर

**जालना । प्रतिनिधी -** मानवा तुझं आहे तुझ्यापाशी, पण मार्ग विसरलाशी, अशी आजच्या पिढीची स्थिती असून जिथे उपचार संपतात तिथे संमोहनशास्त्र कार्य करते, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे आयोजित संम ोहनविषयक कार्यशाळेत छत्रपती संभाजी नगर येथील संमोहनशास्त्र तज्ञ श्री. एस के नांदेडकर यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना येथे खटउ व स्टॉप वेलफेअर कमि टी तर्फे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते, प्रमुख मार्गदर्शक म्हणून छत्रपती संभाजी नगर येथील संमोहनशास्त्र तज्ञ श्री एस के नांदेडकर होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉक्टर महावीर सदावर्ते, खटउ विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. गणेश रोकडे, स्टॉप वेलफेअर कमिटीचे सचिव प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, श्रीमती शोभा पंढरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले.

मानवी जीवनामध्ये संमोहनाचे कोणकोणते फायदे आहेत, हे सांगून कार्यशाळा आयोजन करण्यामागील भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

यावेळी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री एस के नांदेडकर म्हणाले की आनंदी जीवन जगण्यासाठी ,मनासारखे काही घडण्यासाठी प्रयत्न व परिश्रम करण्याची गरज आहे, परंतु आज मानवी जीवन भरकटलेले आहे त्याला योग्य दिशाची गरज असून त्यासाठी संमोहन शास्त्र अतिशय उपयुक्त आहे. व्यक्तींमधील सुखदायी जीवनाचा प्रवास घडून आणण्यासाठी, अंतर्मनाचे रहस्य उलगडून सांगण्याचे कौशल्य फक्त संमोहन शास्त्रातच आहे प्रत्येकाने आपल्या अंतर्मनाची शक्ती ओळखली पाहिजे, त्यामुळे यशस्वी, सुखी जीवन होऊन समृद्धीकडे वाटचाल होते. नैराश्यमय जीवनातून मुक्ती तसेच दैनंदिन ताणयातणावा पासून मुक्त जीवन, व्यक्तिमत्त्वाचा विकास टाईम मॅनेजमेंट ,मनी मॅनेजमेंट, मनातील न्यूनगंड दूर करण्यासाठी जीवनात भाषण संभाषण कला अवगत करण्याकरता, मानवी संबंध व सहकाऱ्यांची संबंध वाढवण्यासाठी, गमावलेला




आत्मविश्वास जागवण्यासाठी, निरोगी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी तसेच विविध आजार व विकारांपासून मुक्त होण्यासाठी, स्मरणशक्ती वाढवण्यासाठी, वाईट सवयी व व्यसनापासून मुक्त होण्यासाठी संमोहन शास्त्राची गरज आहे ,विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक यश प्राप्ती चा मंत्र संमोहन शास्त्र देते. विविध सम स्यांचे निराकरण संमोहनातून होते. आंतरिक शक्ती वाढवण्यासाठी ध्यानधारणा करण्याची गरज आहे, सच्चया ध्यान साधनेतूनच ज्ञान प्राप्त होते.

संमोहन प्रयोगातून व्यक्तीचे दुःख निर्मूलन होते संपलेले जीवन पुन्हा सुरू होते व्यक्ति वरील दोष नाहीसे होतात मनातील भीती दूर होते अंतरिक क्षमता वाढून नवीन प्रेरणा मिळतात, स्वभावात व कृतीत बदल घडतात, आणि व्यक्ती झपाट्याने कार्य करू लागते, केलेल्या कार्यातूनच त्याला यश प्राप्ती, अर्थप्राप्ती होते. संमोहनाला आरोग्याची संजीवनी शास्त्रही म्हटले जाते, संमोहन ही ऋषीमुनींकडून मि ळालेली देणगी असून, आज आपण विसरलेलो आहोत, तुझ आहे तुझं पाशी मार्ग विसरलाशी.अशी मानवी अवस्था झाल्याचे ही श्री. नांदेडकर यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की , संमोहनातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, आंतरिक प्रेरणा वाढवून, आपण विविध समस्यांवर मात करू शकतो, अगदी दुर्धर आजार बरे होतात ,त्यासाठी मनाची तयारी असावी लागते. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये विविध कौशल्य विकसित करण्यासाठी संमोहनाची गरज आहे ,असेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.धनश्री देशपांडे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. बाबासाहेब वाघ यांनी मानलेत.

या कार्यशाळेस म हाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.